संग्रहाल

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.

विषय

दा. क्र.

IRBK-0105771

IRBK-0105771



सत्वशील

# हरिश्चंद्र राजाची कथा.





म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल. वा.
दा. क्र. ५७५१

......चित्रशाळा प्रकाशन, पुणें २......

सत्त्वशील

# हरिश्चंद्र राजाची कथा

लेखक

नरहर परशुराम महाजन

किंमत ६ आणे

IRBK-0105771

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

: मुद्रक व प्रकाशक :
दामोदर त्र्यंबक जोशी,
बी. ए. ( टिळक ),
व्यवस्थापक : चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें शहर

* * *

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

आवृत्ति तिसरी : १९५६

* * *

## : अनुक्रम :


| कथा | पृष्ठ |
|---|---|
| १ ओळख | .... ३ |
| २ राजा हरिश्चंद्र | .... ४ |
| ३ इंद्र–सभा | .... ६ |
| ४ राज्यदान | .... ९ |
| ५ प्रवासांतील संकटें | .... १२ |
| ६ दक्षिणा देऊन दान पुरें केलें | .... १८ |
| ७ डोंबाच्या घरीं | .... २१ |
| ८ रोहिदासाचा मृत्यु | .... २४ |
| ९ आणखी छळ | .... २६ |
| १० आनंदी आनंद | .... २९ |
| ११ कथेचा शेवट | .... ३२ |

: १ :

# ओळख



**मु**लांनो, श्रीराम आणि सीता यांची कथा तुम्हीं वाचली आहे. राम हा शूर, खरें बोलणारा व बोलल्याप्रमाणें

चालणारा होता. तसेंच सीतेची गणना ' नित्य स्मरणीय पंचकन्येंत' केली गेली असून ' पति हाच स्त्रीचा अलंकार' व ' पतीचें जें सुखदुःख तेंच आपलें सुखदुःख ' असें मानून ती वागणारी होती. हे गुण रामाच्या अंगीं कां आले? त्याचें कारण असें आहे कीं, रामाच्या वंशांत पूर्वीं अयोध्यानगरींत हरिश्चंद्र नांवाचा सत्यवादी, सत्त्वशील आणि बोलल्याप्रमाणें चालणारा, असा राजा होऊन गेला. त्याची बायको तारामती ही सुद्धां त्याच्याचसारखी थोर आणि पतिपरायण अशी होती. आज याच हरिश्चंद्र राजाची कथा मी तुमच्या हातीं वाचावयास देत आहें.

* * * *

## : २ : राजा हरिश्चंद्र

**फार** प्राचीन काळीं इक्ष्वाकु कुळांत त्रिशंकु नांवाचा गुणवान् राजा होऊन गेला. त्याचा मुलगा हरिश्चंद्र. लहानपणापासून हरिश्चंद्राचा कल सत्यानें वागण्याकडे होता. त्रिशंकूच्या मागून हरिश्चंद्र हा अयोध्येचा राजा झाला. राजाच्या अंगांत जितके म्हणून चांगले गुण

असावे लागतात तितके हरिश्चंद्राच्या अंगांत होते. तो



हरिश्चंद्रास अशीं सर्व सुखें अनुकूल होतीं.

धर्मशील असून दानशूरपणाबद्दल त्याची फार ख्याति

होती. त्यामुळें सगळ्या प्रजेचें त्याच्यावर प्रेम होतें. त्याची बायको तारामती ही अत्यंत सद्‌गुणी असून पतीच्या आज्ञेंत वागणारी होती. मुलगा रोहिदास याच्याविषयीं तर सांगावयासच नको. कारण 'मुलगा कसा असावा तर, तो रोहिदासासारखा ' असें सर्व लोक म्हणत इतका तो गुण-संपन्न होता.

हरिश्चंद्रास अशीं सर्व सुखें अनुकूल होतीं. तरी सुद्धां त्याला कांहीं दिवस अत्यंत दुःखांत काढावे लागले! राजाबरोबर तारामती आणि रोहिदास यांनींहि दुःखांत काळ कंठिला. पण सत्त्व ढळूं दिलें नाहीं. तें कसें ? ती कथा आतां पुढें वाचा.

* * * *

## : २ : इंद्रसभा

एकदां स्वर्गांत इंद्रसभा भरली असतां त्या ठिकाणीं नारदाची स्वारी आली. नारद हे ब्रह्मदेवाचे पुत्र. भगवत्-भक्त म्हणून त्यांची प्रसिद्धि आहे. स्वर्ग, मृत्यु व पाताळ या तिन्ही लोकांत कोठें काय चाललें आहे, त्याची बातमी श्रीविष्णूला पुरविण्याचें काम सर्वत्र संचार करून ते नेहमीं करीत.

नारदाचा वेष उभी शेंडी, उभें गंध, मधें अक्षदेचा टिकला, एका हातांत ब्रह्मवीणा, दुसऱ्या हातात चिपळ्या, पायांत खडावा, गळ्यांत वैजयंती माळ व मुखानें प्रभुनामाचा गजर असा असे. वेष बावळा, पण स्वभाव विनोदी. त्याच्या या विनोदी स्वभावामुळें देवादेवांत, देव-दानवांत त्यांनीं अनेक भांडणें लाविलीं. त्या भांडणांचा परिणाम कोणता व्हावयाचा हें ठरलेलें. म्हणून त्यांना 'कळलावे नारद' म्हणत. इंद्रसभेंत आल्यावरसुद्धां त्यांनीं कळ लावून कसें भांडण लाविलें तें पाहा.



इंद्रांनीं नारदास आपल्याजवळ बसण्यास जागा दिली. कुशल प्रश्न झाल्यावर सभा सुरू झाली. निघतां निघतां विषय निघाला कीं, "पृथ्वीवर सर्वश्रेष्ठ राजा कोण?"

तेव्हां नारद म्हणाले, "अयोध्येच्या हरिश्चंद्र राजा-सारखा सत्त्वशील व सत्यवादी असा राजा जगांत दुसरा कोणी नाहीं." असें सांगून त्यांनीं हरिश्चंद्राची खूपच वाखाणणी

केली. त्या वेळीं हरिश्चंद्राचे गुरु वसिष्ठ ऋषि तेथेंच होते. त्यांनींहि नारदाच्या म्हणण्यास दुजोरा दिला. पण ही गोष्ट तेथेंच बसलेले वसिष्ठ मुनीचे प्रतिस्पर्धी जे विश्वामित्र ऋषि त्यांना सहन झाली नाहीं. त्यांनीं हरिश्चंद्राची परीक्षा पाहाण्याचा निश्चय केला. ते म्हणाले, " वसिष्ठा, तूं आपल्या शिष्याचें इतकें काय स्तोम माजवीत आहेस? माझ्या परीक्षेस जर तो राजा उतरेल तर मी ही गोष्ट खरी मानीन." यावर वसिष्ठ म्हणाले, "जर राजा तुझ्या परीक्षेस उतरला तर तूं काय देशील? मी खात्रीनें सांगतों कीं, हरिश्चंद्र सत्त्वापासून लेशभर ढळणार नाहीं." विश्वामित्र म्हणाले, "वसिष्ठा, तुझी बडबड पुरे कर. मी हरिश्चंद्राचें सत्त्व हरण करतोंच. तसें जर न घडेल तर हा विश्वामित्र आपण केलेल्या साठ हजार वर्षांच्या तपाचें फळ हरिश्चंद्रास देईल." असें बोलून विश्वामित्र ऋषि रागानें हरिश्चंद्राचें सत्त्व हरण करण्यासाठीं तेथून निघून गेले आणि सभाहि संपली.

झालेल्या प्रकारामुळें वसिष्ठ ऋषीस काळजी उत्पन्न झाली. आतां हे कोपिष्ट विश्वामित्र ऋषि हरिश्चंद्रावर कोणतें संकट आणतील तें आणोत, पण झाल्या गोष्टीस इलाज नाहीं, असा विचार करून ते स्वस्थानीं गेले.

मुलांनो, विश्वामित्र ऋषींनीं हरिश्चंद्र राजावर कोणतें संकट आणिलें ? तें पुढील कथेंत वाचा.


* * * *

## : ४ : राज्यदान

प्रथम विश्वामित्रानीं हरिश्चंद्रास एक स्वप्न पाडिलें. त्या स्वप्नांत हरिश्चंद्रानें आपलें राज्य व सर्व संपत्ति एका ब्राह्मणास दान केली.

दुसरे दिवशीं हरिश्चंद्र, तारामती, रोहिदास आणि प्रधानास तें स्वप्न सांगत असतां स्वप्नांतील ब्राह्मण तेथें आला, आणि हरिश्चंद्रास म्हणाला, " राजा, तूं रात्रीं मला स्वप्नांत आपलें राज्यदान केलें आहेस; तेव्हां आतां तुझा राज्यावर हक्क नाहीं, माझें राज्य मला दे. " सत्यवादी हरिश्चंद्रानें स्वप्नांतील बोल खरे केले. लगेच ब्राह्मणाच्या स्वाधीन राज्य करून तो अरण्यांत जाण्यास तयार झाला. पण ब्राह्मण म्हणाला, " वर कांहींतरी दक्षिणा दिल्याखेरीज हें दान पुरें होत नाहीं, तेव्हां त्यावर औटभर सोनें दक्षिणा म्हणून दे. "

हरिश्चंद्र खजिन्यांतील द्रव्य दक्षिणा देऊं लागला.



लगेच ब्राह्मणाच्या स्वाधीन राज्य करून तो अरण्यांत जाण्यास तयार झाला.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

तेव्हा ब्राह्मण म्हणाला, "हरिश्चंद्रा, तुला सर्वजण ज्ञानी म्हणतात; पण मला वाटतें त्या कोणाला अक्कलच नाहीं. कारण आता हें खजिन्यातील द्रव्य इतकेंच नव्हे तर तुझ्या राज्यांतील सर्व द्रव्य यावर माझी सत्ता आहे; तें सर्व माझें झालें आहे. मग माझ्या धनाची तूं मला दक्षिणा कशी देतोस ! पाहिजे असल्यास तुझ्या राज्याबाहेर काशीक्षेत्रांत जाऊन तूं आपणांस विकून घेऊन माझी दक्षिणा पुरी कर. नाहीं तर दान पुरें करवत नाहीं असें म्हण, म्हणजे मी आपला परत जातों."

हरिश्चंद्र—महाराज, असा त्रागा करूं नका. मी आपणांस विकून आपली दक्षिणा देतों, तोंवर थांबा.

ब्राह्मण—ठीक. मी तुला एक महिन्याची मुदत देतों; त्या मुदतींत वाटेल तें करून तूं द्रव्य मिळव व माझी दक्षिणा पुरी कर. आतां मी जातों.

इतक्यांत या ठिकाणीं अयोध्येंतील सर्व प्रजाजन जमा झाले. झालेला प्रकार पाहून सर्वांस अत्यंत दुःख झालें. कोणी ब्राह्मणांस म्हणाले, "आम्ही आपलें द्रव्य देऊन आपली दक्षिणा देतों तरी राजास विकण्यास नेऊं नका." पण ब्राह्मणानें कोणाचें म्हणणें ऐकून घेतलें नाहीं. तो

उलट म्हणाला, "माझ्या राज्यांतील द्रव्य तें सर्व माझें द्रव्य. तें राजास कसें दान देतां येईल? आता मी तुमचा राजा आहें. येथें गडबड करूं नका. चला येथून चालते व्हा."

त्या वेळीं हरिश्चंद्रानें प्रजाजनांची समजूत करून त्यांना घरीं परतविलें व आपण, तारामती आणि रोहिदास यांच्यासह काशीपुरीचा रस्ता धरिला. मग तो ब्राह्मणहि तेथून गेला. मुलांनो, हा ब्राह्मण कोण? ओळखलांतना! हा विश्वामित्रच!

* * * *

# : ५ : प्रवासांतील संकटें

## १. छळास आरंभ

हरिश्चंद्र अयोध्येहून काशीस जाण्यास निघाला. त्या वेळीं विश्वामित्र ऋषींनीं सूर्यास प्रखर ऊन पाडण्याची व वरुणास नदी, तलाव, सरोवरें यांतील सर्व पाणी शोषून घेण्याची आज्ञा केली. त्याबरोबर सूर्यानें प्रखर ऊन पाडिलें व वरुणानें अयोध्या ते काशीच्या मार्गांतील नदी, तलाव, विहिरी यांतील पाणी शोषून घेतलें. मुलांनो, पाहा ऋषींच्या तपाचें सामर्थ्य!

तारामती आणि रोहिदास यांसह हरिश्चंद्र रस्ता चालूं लागला. तिघांना कधींच पायीं चालावयाचें माहीत नव्हतें. तिघांचीं तोंडें सुकून गेलीं. त्या प्रखर उन्हामुळें सर्व अंगाला घाम सुटला. घसा कोरडा पडल्यामुळें रोहिदासास तहान लागली. तो पिण्यास पाणी मागूं लागला. म्हणून हरिश्चंद्रानें पाण्याचा शोध केला. पण नदीतलावांत हरिश्चंद्रास थोडेंसुद्धां पाणी आढळलें नाहीं. अखेर तहानेमुळें रोहिदास बेशुद्ध झाला. त्या वेळीं हरिश्चंद्रास व तारामतीस किती वाईट वाटलें असेल बरें. त्यास तारामतीनें कडेवर घेतलें व पुढचा रस्ता धरिला. कांहीं काळ चालल्यावर त्यांच्याकडे वृद्ध ब्राह्मणाच्या रूपानें विश्वामित्र आले आणि ते त्याला म्हणाले, "महाराज, आपण दीनांचे कनवाळू आहांत असें ऐकतों. मी म्हातारपणानें जर्जर झालों आहें. मला हें ऊन सहन होत नाहीं. या उन्हानें माझे पाय पोळून फोड आले आहेत. तरी आपला पायांत घालण्याचा जोडा मला द्या." त्या ब्राह्मणाचें हें भाषण ऐकतांच हरिश्चंद्रानें आपल्या पायांतील जोडा त्यास दिला. नंतर त्यानें आपल्या बायकोसाठीं व मुलासाठीं तारामतीच्या व रोहिदासाच्या जोड्याची मागणी केली.

तेव्हां दोघांनींहि आपल्या संकटाची जाणीव असतांहि जोडे देऊन टाकिले. मुलांनो, याचें नांव उदारपणा !

आपलें काम झालेलें पाहून विश्वामित्र तेथून निघून गेला व त्यांना त्रास देण्यासाठीं गुप्त वेषानें जवळ आसपास राहिला.


* * * *

## २. पाणपोईचें पाणी

ते तिघेहि आतां अनवाणी प्रवास करूं लागले. कडक उन्हामुळें तिघांचेहि पाय पोळून त्यांच्या पायाला फोड आले. तहानेनें जीव व्याकूळ झाला. अशा स्थितींत आपण आतां काशीक्षेत्रास पोहोंचूं किंवा नाहीं, याची त्या तिघांना शंका वाटूं लागली.

इतक्यांत विश्वामित्रानें तेथें एक सुंदर उद्यान निर्माण केलें व चोहों वाटेला पाणपोईची सोय केली. तें उद्यान पहातांच तिघांनाहि वाटलें कीं, आता येथें आपणांस पिण्यास पाणी मिळेल. म्हणून हरिश्चंद्र धांवतच तिकडे गेला, तों तेथें त्यानें पाणपोईची योजना पाहिली; तेव्हां 'पाणपोईचें पाणी आणि अन्नछत्राचें अन्न सेवन करणें हा

अधर्म आहे,' असें जाणून तो तसाच पुढें निघाला. मागून



आतां येथें आपणांस पिण्यास पाणी मिळेल.

तारामती आली तीहि तशीच पुढें निघाली. तिला विश्वामित्र पाणी पिण्याविषयीं विनवूं लागला. पण तें पाणी पिण्याचें तिनें नाकारलें. मागून रोहिदास आला. पाणी पाहतांच त्याचा आनंद काय विचारावा! पण पाहतों तों 'पाणपोईचें पाणी'. तेव्हां त्या पाणपोईकडे पाठ करून तोहि आईबापांच्या मागें निघाला. त्याच्याकडे धांवतच जाऊन विश्वामित्र म्हणाला, "बाळा, तुझें तोंड फार सुकलें आहे. तुला तहानभूक लागलेली दिसते. ये, मी तुला चांगलें अन्न खावयास व चांगलें पाणी पिण्यास देतों." तेव्हां रोहिदास म्हणाला, "महाराज, तें पाणपोईचें पाणी पिण्याचा मला आग्रह करूं नका. तें पाणी जर मी प्यालों तर माझ्या सूर्यवंशाला कलंक लागेल. माझे आईबाप दूर गेले आहेत. आतां मला जाऊं द्या." असें बोलून रोहिदास तेथून निघून गेला. रोहिदासाचें तें धर्मावरील प्रेम पाहून विश्वामित्रास आश्चर्य वाटलें. तो मनांत म्हणाला, "अशा सत्त्वानें वागणाऱ्या बालकापुढें आपल्या तपाच्या सामर्थ्याची काय किंमत! प्रतिज्ञा करून फुकट फसलों. आतां त्याचा कशाला विचार! अजून काय झालें? प्रयत्न करून पाहूं." असा विचार करून तो तिघांच्या पाठीस लागला.

क्र. ०५/५.५९

## ३. आग! आग!! आग!!!

पुढें विश्वामित्रानें वणवा पेटवून त्या तिघांची चुकामूक केली. मोठमोठाले वृक्ष धडाधड जळूं लागले. एकच आकांत उडाला. तिघेहि एकमेकांचीं नांवें घेत सैरावैरा धांवूं लागले. शेवटीं विश्वामित्रांनीं हरिश्चंद्र आणि रोहिदास यांचीं मायेचीं प्रेतें करून तारामतीस दाखविलीं. तेव्हां तिनें अपार शोक केला. ब्राह्मणाचें ऋण फिटलें नाहीं म्हणून तिला वाईट वाटलें. तें ऋण पुढल्या जन्मीं फेडण्याचा निर्धार करून त्या दोघांच्या भेटीस जाण्यासाठीं ती प्राण देण्यास तयार झाली. ही पतिव्रता आतां खराच प्राण देईल, हें ठीक चिन्ह नव्हे, असें पाहून विश्वामित्रानें हरिश्चंद्र व रोहिदासास त्यावेळीं तेथें आणिलें. रोहिदास 'आई आई' म्हणत तारामतीस बिलगला; तेव्हां तारामतीनें डोळे उघडून दोघांस पाहिलें. तिला अपरिमित आनंद झाला. त्या आनंदांत ते तिघेहि आपलें सर्व दुःख विसरले. नंतर ते तिघे काशीच्या मार्गास लागले. आतां त्यांना विश्वामित्रानें त्रास दिला नाहीं. ते तिघेहि पुढें मोठ्या कष्टानें एक महिन्यानें काशीस पोहोंचले.

काशीस पोहोंचल्यावर हरिश्चंद्रानें ब्राह्मणाची दक्षिणा कशी दिली ? ती हकीकत पुढील कथेंत वाचा.

* * * *

## : ६ : दक्षिणा देऊन दान पुरें केलें

**का**शीस गेल्यावर दुसऱ्या दिवशीं बाजारांत जाऊन भर चौकांत हरिश्चंद्रानें स्त्री–पुत्रांसह आपली विक्री मांडली. तो पुकारूं लागला, "आम्हांला कोणी विकत घ्या हो. रोहिदास बाळाची किंमत अर्धा भार सोनें, तारामतीची किंमत एक भार सोनें आणि माझी किंमत दोन भार सोनें. या पैशानें ब्राह्मणाची दक्षिणा देणें आहे. तरी कसलाहि संशय मनांत न आणितां आम्हांस विकत घ्या. आम्ही वाटेल तें काम करूं." असें तो येणाऱ्या-जाणाऱ्यांस विनवूं लागला.

प्रथम कालकौशिक नांवाच्या ब्राह्मणानें एक भार सोनें देऊन तारामतीस विकत घेतलें. तो तारामतीस घेऊन घरीं जाऊं लागला. तेव्हां रोहिदास आईस जाऊन भेटला व म्हणाला, "आई, तुझ्यावांचून मी एकटा कसा

राहूं ?" तेव्हां तिनें कालकौशिकास विनाविलें कीं, " तुम्हीच माझ्या बाळास विकत घ्या. मायलेकरांची ताटातूट न केल्याचें पुण्य तुम्हांस लागेल." रोहिदासहि म्हणाला, " मी पूजेचें साहित्य आणणें वगैरेंसारखीं कामें करीन." तेव्हां कालकौशिकास दया उत्पन्न होऊन त्यानें अर्धा भार सोनें देऊन रोहिदासास विकत घेतलें; व त्यांना दोघांना घेऊन तो घरीं गेला.

त्या वेळीं हरिश्चंद्रास किती वाईट वाटलें असेल बरें ? पण करणार काय ? सत्यानें चालणारावर अशींच संकटें येतात व त्यामुळें त्यांची परीक्षा होऊन ते थोर पदवीस प्राप्त होतात. सोन्याची चकाकी अग्नींत टाकल्याशिवाय कशी दिसणार ? तसे सत्यानें चालणारे संकटाशिवाय कसे थोर ठरणार ?

पुढें दोन भार सोनें देऊन वीरबाहू नांवाच्या डोंबानें हरिश्चंद्रास विकत घेतलें. इतक्यांत तो ब्राह्मण (विश्वामित्र) तेथें आला. हरिश्चंद्रानें तें आठ भार सोनें त्यास देऊन दान पुरें केलें. त्यांना नमस्कार केला आणि 'आपणांस येथवर येण्याचे श्रम झाले त्याची मला क्षमा करा' अशी विनंति केली. विश्वामित्रानें तें द्रव्य घेतलें. राजा सत्त्वापासून

ढळला नाहीं; म्हणून त्यास अधिकच राग आला व तो कांहीं न बोलतां रागानें तेथून निघून गेला.

आतां हरिश्चंद्र डोंबाबरोबर त्याच्या घरीं गेला. वीरबाहू डोंबाचें घर म्हणजे निव्वळ ‘ खाटीकखाना ’ होता. जिकडे तिकडे जनावरांचीं प्रेतें व हाडें पडलीं होतीं. त्याची स्त्री अत्यंत कजाग होती. वीरबाहूनें ‘ कामासाठीं हा मनुष्य विकत आणला आहे, त्याच्याकडून सर्व कामें करून घे, ’ म्हणून बायकोस सांगितलें. हरिश्चंद्र कामास लागला.

वीरबाहूचें घर म्हणजे हरिश्चंद्रास नरकवासासारखें वाटलें. पण करणार काय ? संकटास तोंड दिलें पाहिजे. सत्त्वापासून लेशभरहि ढळावयाचें नाहीं हा त्याचा बाणा. आपलें सत्त्व गेलें नाहीं या गोष्टीचाच आनंद मानून तो कामास लागला. मुलांनो, विश्वामित्रांनीं हरिश्चंद्रास इतकें छळलें तरी त्याचें समाधान झालें नाहीं. उलट त्यानें त्या तिघांस पुढें जास्तच छळलें. तें कसें, तें पुढील कथेंत पाहा.


✢ ✢ ✢ ✢

# : ७ : डोंबाच्या घरीं

डोंबाच्या घरीं हरिश्चंद्रास हलकीसलकीं सारीं कामें करावीं लागत. तशांत डोंबाची बायको ही फार कजाग होती. ती हरिश्चंद्राजवळून सकाळचें झाडसारवण, दळण-कांडण आणि पाणी आणणें हीं कामें करवून घेई. त्यामुळें स्वतःचें जेवण करण्यास सुद्धां हरिश्चंद्रास वेळ मिळत नसे. तशात विश्वामित्राचा छळ. ते त्याच्या पाठीस लागलेले. मग काय विचारावें ? त्यांनीं हरिश्चंद्रास पोटभर जेवूं सुद्धां दिलें नाहीं. तें कसें ? तें पाहा–

हरिश्चंद्र पाणी भरीत असतां रांजणाच्या बुडाला विश्वामित्रांनीं भोंक पाडून ठेवावें. त्यामुळें किती जरी पाणी ओतलें तरी तो रिताच राही. त्यामुळें हरिश्चंद्रास पाणी भरण्यास दुपार होऊन जाई. नंतर गंगेवर स्नान करून राजानें स्वयंपाक तयार केला, म्हणजे विश्वामित्राची स्वारी अतिथिवेषानें तिथें तयार. मग हरिश्चंद्रानें केलेलें अन्न खाऊन ढेकर देऊन स्वारी तेथून पसार. त्यामुळें हरिश्चंद्रास उपास घडे. अतिथीस परत लावावें; तर हातून अधर्म घडेल;

# म्हणून कधीं अर्धपोटीं तर कधीं उपाशी राहून हरिश्चंद्र



म्हणून तिनें हरिश्चंद्रास मारावें.

डोंबाच्या घरीं कष्ट करी. यामुळें त्याच्या शरीराचा नुसता सांपळा उरला होता.


दुपारीं डोंबाची बायको हरिश्चंद्रास दळण दळण्यास लावी. त्या वेळीं विश्वामित्रांनीं तेथें येऊन त्यानें दळलेलें पीठ त्याच्या तोंडास लावून सर्व पीठ घेऊन तेथून जावें. त्यामुळें डोंबाच्या स्त्रीला वाटे हरिश्चंद्रच पीठ खातो, म्हणून तिनें हरिश्चंद्रास मारावें. पहा, एवढा मोठा पृथ्वीचें पालन करणारा राजा पण डोंबाच्या स्त्रीचा मार खाई. ‘सत्त्वपालनासाठीं संकटाशीं झगडलेंच पाहिजे’ अशा विचारानें तो सर्व गोष्टी मुकाट्यानें सहन करी. अधर्मानें वागण्याची हरिश्चंद्रास केव्हांच इच्छा झाली नाहीं. याचें नांव थोरपणा !

वरील कारणामुळें डोंबाची स्त्री दररोज वीरबाहूस हरिश्चंद्राविरुद्ध तक्रार सांगे. वीरबाहूहि हरिश्चंद्रास रागें भरी. अखेर या तक्रारीस कंटाळून वीरबाहूनें हरिश्चंद्रास स्मशानांत प्रेतांवरील कर वसूल करण्याची कामगिरी सोंपविली. हरिश्चंद्र तें स्मशानांतील कामहि दक्षतेनें करूं लागला.

## :८: रोहिदासाचा मृत्यु

इकडे तारामती आणि रोहिदास कालकौशिक ब्राह्मणाच्या घरीं दुःखांत दिवस कंठीत होते. तेथें रोहिदासाकडे तुळशीफुलें आणण्याची व तारामतीकडे घरांतील सर्व कामें व स्वैपाकपाणी करण्याची कामगिरी होती.

एके दिवशीं रोहिदास कमळें आणण्यासाठीं रानांत गेला होता. त्या वेळीं विश्वामित्रानीं तक्षकास ( सापास ) रोहिदासाला चावण्याची आज्ञा केली. रोहिदास कमळें तोडूं लागतांच तक्षक त्यास तेथें येऊन चावला. त्याबरोबर रोहिदासास भयंकर वेदना होऊन मृत्यु आला. ती हकीकत तारामतीस कळली; त्या वेळीं ती ब्राह्मणास जेवण्यास वाढीत होती. ब्राह्मणास अर्धपोटीं वाढून इथून जाणें इष्ट नाहीं, म्हणून रोहिदासास साप चावल्याचें दुःख सुद्धां तिनें धर्मासाठीं कांहीं काळ गिळलें. ब्राह्मणाचें जेवण झाल्यावर तिनें आकांत मांडला. नंतर कालकौशिकाची परवानगी घेऊन रोहिदास होता, तेथें ती आली. रोहिदासास पहाताच तिनें त्याचें डोकें मांडीवर घेतलें व ती रडूं लागली. एवढ्या मोठ्या राजाची ती राणी पण



तक्षक तेथें येऊन रोहिदासास चावला

तिची समजूत करण्यासमुद्धां तेथें कोणी नव्हतें. काय हा दैवाचा खेळ !

इतक्यात विश्वामित्र निराळ्याच वेषानें तेथें आले. ती वेळ संध्याकाळची असून नुकताच काळोख पडूं लागला होता. विश्वामित्रांनीं तिची समजूत घातली व ते म्हणाले, " बाई, आतां तूं येथें रडत बसूं नकोस. अंधार आहे तोंच मुलाचें प्रेत जाळून टाक. नाहींतर डोंब कराचे पैसे मागील. ते तूं कोठून देशील ? " तारामतीस विश्वामित्राचें म्हणणें पटलें. मग तिनें तें प्रेत विश्वामित्राच्या मदतीनें स्मशानांत आणिलें. विश्वामित्रांनींच काटक्या गोळा करून चिता रचली आणि ती पेटविली.

ती पेटलेली चिता पाहतांच डोंबाचा इमानी नोकर हरिश्चंद्र धांवत तेथें आला, आणि त्यानें ती चिता विझविली.

पुढें रोहिदासाचें प्रेत जाळलें किंवा नाहीं, विश्वामित्रांनीं तारामतीचा आणखी कसा छळ केला तें पुढील कथेंत पाहा.

## : ९ : आणखी छळ

चिता विझविल्यावर हरिश्चंद्र तारामतीस म्हणाला, " कर दिल्यावांचून प्रेत जाळणारी तूं कोण ? "

तारामती दुःख आवरून म्हणाली, " मी हरिश्चंद्राची तारामती आहे." पहा मुलांनो, प्रत्यक्ष नवराबायको समोरासमोर असतांना दोघांनींहि एकमेकांस ओळखलें नाहीं. इतकीं त्यांचीं रूपें कष्टांनीं पालटलीं होतीं. तरी सुद्धां अजून विश्वामित्रास त्यांची दया आली नाहीं.

पुढें ती म्हणाली, " साडेसातीच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळें मला दुसऱ्याच्या घरीं राबावें लागत आहे. माझ्या पतीची व माझी ताटातूट झाली आहे. तशांत माझा मुलगा सर्पदंशानें मरण पावला आहे. त्याला जाळण्यासाठीं येथें आलें, तों हा प्रसंग ! तेव्हां त्याला जाळण्याची मला परवानगी द्या, गरीबावर दया करा."

ही हकीकत ऐकल्यावर हरिश्चंद्रास किती दुःख झालें असेल ? हें कसें सांगावें ? त्याचा दुःखावेग कमी झाल्यावर तारामतीची समजूत घालून तो प्रेत जाळण्याची परवानगी मागण्यासाठीं डोंबाकडे गेला.

हरिश्चंद्र गेल्यावर विश्वामित्र तारामतीस म्हणाले, " तूं एकटी येथें भिशील. तेव्हां तूं शेजारच्या देवळांत जाऊन देवाचें नांव घेत बैस. मी तर आतां येथें कोठवर

बसणार ? त्याप्रमाणें तारामती देवळांत जाऊन बसली व तिनें डोळे झांकून देवाचें चिंतन चालविलें.


नंतर विश्वामित्रांनीं रोहिदासाचें प्रेत फाडिलें व त्याचीं आंतडीं काढून तीं हळूंच तारामतीच्या गळ्यांत घालून तिच्या हातातोंडास रक्त फांसलें. मग गांवांत जाऊन असा पुकारा केला कीं, गांवाबाहेर स्मशानाजवळच्या देवळांत एक लांव पोरें खात बसली आहे. तें ऐकून बरेच लोक धांवत तेथें आले. पाहतात तों खरेंच लांव. मग काय. एकच धांवपळ उडाली. कांहीं धीट लोक देवळांत गेले. त्यांनीं तिला फरफटत ओढीत राजाकडे नेलें. राजानें तिचें डोकें उडविण्याचा हुकूम डोंबास दिला. डोंबानें तें काम आपला नोकर जो हरिश्चंद्र त्यास सांगितलें.

मुलांनो, आतां मात्र हरिश्चंद्राच्या छळाचा कळस झाला. मुलगा तर गेलाच. शिवाय निरापराधी प्रिय पत्नीस स्वतः ठार मारण्याची वेळ. अशा दुःखद वेळीं तो आपलें कर्तव्य करण्यास डगमगला काय ? याचें उत्तर पुढील कथेंत कळेल.

* * * *

तारामतीस पुत्रशोकाचें अनावर दुःख झालें असून तिची फजिती झाली होती. तरी पतीच्या हातून आपणास मरण येणार म्हणून तिला आनंद झाला. ती आपल्या कुलदेवतेस, वसिष्ठास, विश्वामित्रास व हरिश्चंद्रास नमस्कार करून मरण्यास तयार झाली. हरिश्चंद्रहि सर्व दुःख बाजूला ठेवून 'धन्याची आज्ञा' हें कर्तव्य बजावण्यासाठीं तारामतीस ठार मारण्यास तयार झाला. त्यानें हातांत शस्त्र घेऊन उगारिलें. तो आतां तारामतीस ठार करणार! इतक्यांत प्रत्यक्ष भगवान् शेषशायी श्रीविष्णु, नारद, वसिष्ठांसह तेथें प्रगट झाले व त्यांनीं वरचेवर हरिश्चंद्राचा हात धरला. हात कोणीं धरला तें पाहण्यासाठीं हरिश्चंद्रानें मान वळविली तों काय! प्रत्यक्ष परमेश्वराचें दर्शन! त्यावेळीं हरिश्चंद्रास आज आपल्या जन्माचें खरें सार्थक झालें असें वाटलें. मग त्यानें परमेश्वरास साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां भगवंतांनीं त्यास उठविलें व म्हणाले, " हरिश्चंद्रा, धन्य तुझी! तुझ्यासारखा सत्त्वशील

व सत्यवादी राजा आजवर दुसरा कोणी झाला नाहीं. आतां तूं आपल्या स्त्रीपुत्रांसह सुखानें राज्य कर. तूं म्हणशील



इतक्यांत प्रत्यक्ष भगवान श्रीविष्णु नारदासह प्रकट झाले.

तेव्हां तुला स्वर्गप्राप्ति होईल." इतक्यांत रोहिदासहि जिवंत होऊन धांवत तेथें आला, व त्यानें ईश्वरास वंदन केलें. तारामतीनेंहि सर्वांस नमस्कार केल्यावर विश्वामित्र म्हणाले, " तारामती, आतां तुझी काय इच्छा आहे तें माग. मी तुमचें सदाचरण व सत्य पाळण्याचें व्रत पाहून प्रसन्न झालों आहे."

तारामती म्हणाली, " प्रभो! हरिश्चंद्रासारखा पति, रोहिदासासारखा पुत्र, वसिष्ठासारखा गुरु व विश्वामित्रासारखा याचक जन्मोजन्मीं मिळो." हें तिचें भाषण ऐकतांच विश्वामित्रास आनंद झाला. त्यांनीं तिला अखंड सुखप्राप्ति होईल असा वर दिला.

नंतर विश्वामित्रांनीं नारद व वसिष्ठाजवळ आपला पराभव कबूल केला; आणि त्यांनीं आपण केलेल्या साठ हजार वर्षांच्या तपाचें पुण्य हरिश्चंद्रास दिलें. सर्वत्र आनंदी आनंद झाला. स्वर्गातील देवांनीं हरिश्चंद्रावर पुष्पवृष्टि करून त्याचा जयजयकार केला; तेव्हां परमेश्वर गुप्त झाले व विश्वामित्र स्वस्थानीं निघून गेले.

मुलांनो, हरिश्चंद्राच्या सुखाला आतां सीमा राहिली नाहीं. हा कशाचा प्रभाव?

* * * *

## : ११ : कथेचा शेवट

हरिश्चंद्रास आतां काशीक्षेत्रांत राहण्याचें कार नव्हतें. काशीच्या राजानेंहि हरिश्चंद्राचा मोठा गौरव केला. हरिश्चंद्र, तारामती, रोहिदास व वसिष्ठ गु काशीविश्वेश्वराचें दर्शन घेऊन अयोध्येच्या मार्गास लागले. काशीच्या राजानें त्यांना अयोध्येस पोहोंचविण्याची नीट व्यवस्था केली.

चौघेहि अयोध्येस येऊन पोहोंचले. तेव्हां प्रजाजनांना फार आनंद झाला. त्या आनंदाप्रीत्यर्थ सर्वांनीं गुढ्यातोरणें उभारून मोठा सुखसोहळा केला. हरिश्चंद्रानेंहि सर्वांचा योग्य गौरव करून गोरगरिबांना अपार संपत्ति दान केली.

हरिश्चंद्रानें पुढें पुष्कळ दिवस न्यायानें राज्य केलें. नंतर रोहिदासास गादीवर बसवून तो तारामतीसह अखंड सुखप्राप्तीसाठीं स्वर्गलोकीं गेला.

IRBK-0105771

IRBK-0105771

ग्रं. क्र. ..१०८०९.. नों. दि ........
वि. ........

ग्रंथ संग्रहा
वाचनालय शाखा